PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
B'Live® SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
Delightful delicacies!
B'Live Restaurant
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768
Also available on zomato SWIGGY

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३१० ■ बुधवार १२ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26


घरचा स्वाद, घरची शुध्दता...
शुद्ध घी
नवल
म्हशीचे व गायीचे साजुक तूप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड, धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com

## कोलंबोतील शक्तीशाली भुकंपात दोनशे चोवीस ठार सत्तावीसशेहून अधिक बेपत्ता, ढिगाऱ्यांखाली शोध सुरू

**बोगोटा, दि. ११ : कोलंबियाच्या पश्चिम भागाला सोमवारी ७.४ रिश्टलस्केल तीव्रतेच्या शक्तीशाली भूकंपाचा जबरदस्त धक्का बसला. या भीषण नैसर्गिक आपत्तीत आतापर्यंत किमान २२४ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. तसेच दोन हजार सातशेहून अधिक नागरिक बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. मोठ्या प्रमाणावर इमारती कोसळल्याने मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. बचाव पथकांकडून ढिगाऱ्यांमध्ये अडकलेल्या नागरिकांचा युद्धपातळीवर शोध सुरू आहे. कोलंबियाच्या पश्चिमेकडील चोको प्रांताजवळ भूकंपाचा केंद्रबिंदू होता. स्थानिक वेळेनुसार सकाळी सात वाजून ३४ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले. अमेरिकेच्या भूगर्भ सर्वेक्षण संस्थेने भूकंपाची तीव्रता ७.४ असल्याचे नोंदवले आहे. भूकंपाची खोली सुमारे ११० किलोमीटर असल्याचे भूगर्भ सर्वेक्षण यंत्रणेने म्हटले आहे.**



कोलंबियाच्या भूवैज्ञानिक सेवेने सांगितले की, सोमवारी झालेला शक्तिशाली भूकंप हा या शतकात देशात आतापर्यंत नोंदवलेला सर्वात शक्तिशाली भूकंप होता. त्यानंतर या प्रदेशात अनेक भूकंपाचे धक्के बसले. भूकंपाचा केंद्रबिंदू कोलंबियाच्या पॅसिफिक प्रदेशात होता. जो पॅसिफिक रिंग ऑफ फायरच्या बाजूला वसलेला आहे. हा एक विशाल भूकंपीय पट्टा असून जगातील बहुतेक भूकंपांसाठी तोच जबाबदार आहे. या भूकंपामुळे पश्चिम कोलंबियातील अनेक शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पेरेरा, काली, मनिझालेस आणि क्बिदो या भागांना भूकंपाचा मोठा फटका बसला. अनेक इमारती कोसळल्या असून, नागरिक ढिगाऱ्यांमध्ये अडकले आहेत. बचाव कार्यादरम्यान स्थानिक नागरिकही मदतीसाठी पुढे आले आहेत. मनिझालेस मधील जवळपास शंभर वर्षे जुने ऐतिहासिक कॅथेड्रलही भूकंपामुळे मोठ्या प्रमाणावर बाधित झाले. काली शहरातही अनेक इमारतींचे नुकसान झाल्याचे वृत्त आहे. हजारो घरांना हानी पोहोचल्याची प्राथमिक माहिती असून, पायाभूत सुविधांवरही **(पान ४ वर)**

## गोळीबाराचा आदेश कुणाचा शाह यांनी उत्तर द्यावे : गांधी

नवी दिल्ली, दि. ११- झारखंडमध्ये विद्यार्थी आंदोलनावर झालेल्या पोलिस कारवाईवरून काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारच्या विरोधात आक्रमक भुमिका घेतली आहे. विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध करताना राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आंदोलनातील हिंसाचाराबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांवर गोळीबार करण्याचा आदेश कोणी दिला? असा थेट प्रश्न उपस्थित करून उत्तराची मागणी केली. फॅन्टसी संभाषण नको यापुर्वी राहुल गांधी यांनी सरकारकडून प्रस्तावित चर्चेला फॅन्टसी संभाषण असे संबोधत, गृहमंत्र्यांनी आधी पोलिस कारवाई आणि गोळीबार संदर्भातील प्रश्नांची उत्तरे द्यावीत, अशी **(पान ४ वर)**

## कुंभमेळा कामांच्या पाचशे कोटींच्या बनावट वर्कऑर्डर फसवणूक करणाऱ्या खान्देशातील तिघांपैकी एक धुळ्याचा

**नाशिक, दि.११ (विश्वास मदाने)- नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नावाखाली राज्यातील ठेकेदारांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घालणारा एक मोठा गैरप्रकार उघडकीस आला आहे. विभागीय महसूल आयुक्त तसेच सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त यांच्या बनावट स्वाक्षऱ्यांचा गैरवापर करून सुमारे ४०० ते ५०० कोटी रुपयांच्या बनावट वर्कऑर्डर वितरीत करण्यात आल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. याप्रकरणी कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांच्याकडे तक्रार दाखल होताच त्यांनी तातडीने पोलिसांना कडक कारवाईचे निर्देश दिले आहेत.**

चार संशयितांचा सहभाग: या फसवणुकीच्या मास्टरमाइंडमध्ये जामनेर तालुक्यातील दोन, जळगाव येथील एक आणि धुळे येथील एक अशा एकूण चार संशयितांचा समावेश आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या: संशयितांनी विभागीय महसूल आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून सुमारे ४०० ते ५०० कोटी रुपयांच्या कामांचे बोगस आदेश तयार केले.संशयितांनी ठेकेदारांकडून परस्पर रोख रक्कम व धनादेश (चेक) स्वीकारून या बनावट वर्कऑर्डर्स दिल्या. मात्र, शासनाच्या नियमानुसार आवश्यक असलेला मक्यूआर कोडफया पत्रांवर नसल्याने काही सजग ठेकेदारांना संशय आला आणि या संपूर्ण रॅकेटचा भांडाफोड झाला.कुंभमेळ्यातील सर्व विकासकामांसाठी केवळ ऑनलाइन निविदा प्रक्रिया राबवली जात असल्याचे राज्य सरकार, महापालिका व कुंभमेळा प्राधिकरणाने आधीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे ठेकेदारांनी कोणत्याही ऑफलाइन वर्कऑर्डर स्वीकारू नयेत व आर्थिक व्यवहार करू नयेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**कुंभमेळ्याचे टेंडर ऑनलाईन**

कुंभमेळ्याचे कोणतेही टेंडर ऑफलाइन काढलेले नसून सर्व प्रक्रिया पारदर्शक व ऑनलाइन सुरू आहे. या रॅकेटमधील किती बनावट वर्कऑर्डर्स बाजारात फिरत आहेत, याचा कसून तपास सुरू आहे. या गुन्हेगारांवर कठोर कारवाई करून त्यांना तात्काळ गजाआड करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत. अशी माहिती गिरीश महाजन, कुंभमेळामंत्री यांनी दिली.

## महापालिकेतर्फे हर घर तिरंगा रॅली धुळे शहराच्या अनेक भागातून फिरली



**धुळे, दि.११- केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त धुळे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य हर घर तिरंगा बाईक रॅलीने सोमवारी संपूर्ण शहर देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले. तिरंग्याच्या साक्षीने निघालेल्या या रॅलीने शहरवासीयांचे लक्ष वेधून घेत राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि तिरंग्याविषयीचा अभिमान जागविण्याचा प्रभावी संदेश दिला.**

रॅलीच्या समारोपप्रसंगी महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस यांनी प्रत्येक नागरिकाने भारतीय ध्वजसंहितेचे पालन करून आपल्या घरावर सन्मानपूर्वक तिरंगा ध्वज फडकवावा, असे आवाहन केले. हर घर तिरंगा ही केवळ मोहीम नसून राष्ट्रभक्तीची सामूहिक अभिव्यक्ती असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, स्थायी समिती सभापती लताबाई सोनार, महिला व बालकल्याण सभापती उज्ज्वला ठाकरे तसेच अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. धुळे महानगरपालिका मुख्य प्रवेशद्वारापासून रॅलीला प्रारंभ झाला. महापौर मायादेवी परदेशी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. तिरंगी फुगे आकाशात झेपावताच आणि भारत माता की जय, वंदे मातरम अशा देशभक्तीपर घोषणांच्या गजरात वातावरण उत्साहाने भारावून **(पान ४ वर)**

## बनावट व शरीराला घातक दारु बनविणाऱ्या टोळीवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करा- शिवसेना उबाठा

**धुळे, दि.११- गेल्या ३ महिन्यांत धुळे जिल्ह्यामध्ये वॉटर प्लांट व इतर धंद्याच्या आड अक्षरशः इंग्लीश व देशी दारुच्या ब्रॅण्डेड कंपनीचे लेबल, बुच बसवून ती दारु अस्सल असल्याचे भासवून सर्रास विक्री केली जात आहे. बनावट व शरीराला घातक दारू बनविणाऱ्या टोळीवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करा. या मागणीचे निवेदन शिवसेना उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले.**



निवेदनात नमुद केले आहे की,महिन्यांपूर्वी वडजाई येथील शेतात, कुंडाणे शिवारात (ता. धुळे) तसेच बाभळे एमआयडीसी प्लॉट नं. ए-५३ मधील एका शेडमध्ये अर्थात सरकारी जागेत भिंगरी, बॉबी, संत्रा, टँगो पंच सारख्या घातक रसायने, स्पिरीट वापरुन जणू सरकारी परवान्यानुसार बिन बोभाट नकली व विषारी दारु तयार करण्याचा धंदा सुरु होता. धुळे पोलिसांनी तिन्ही ठिकाणचे कारखाने उध्वस्त केले. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन! बाभळे एमआयडीसीच्या जागते व कुंडाणे येथील शेतातील या दोन्ही कारखान्यामध्ये वॉटर प्लांट, स्पिरीट, रसायने, लेबलिंग व बूच पॅकींग मशीन, आर.ओ. प्लांट बाटल्या, ब्रँडेट दारुच्या नावाने खोके असे एकूण १ कोटी पेक्षा जास्त किंमतीचे साहित्य जप्त केले. परंतु आमच्या माहितीनुसार बाभळे एमआयडीसी व कुंडाणे येथे छापा टाकल्यानंतर तेथे धुळ्याचे पुढारपण मिरवणारे सत्ताधारी पक्षातील गुंड, नगरसेवकांचे नातेवाईक यांनी हस्तक्षेप केल्याचे स्थानिक लोक सांगत आहेत. म्हणून पोलीस अधिक्षकांनी या प्रकरणाची अत्यंत सखोल व मुळापर्यंत जावून यामध्ये सामील एकूण एक गुन्हेगारांना शोधून काढावे. जनमाणसामध्ये एक चर्चाही आहे की, हे एवढे मोठे दारु कारखाने चालवणे हे एकट्या माणसाचे काम नाही. ज्यांना म्हणजे कुंडाणे व बाभळे येथील बनावट दारु तयार करणारे एक-एक व्यक्तींना आरोपी केले आहे. तेच संशयास्पद आहे. हे लोक तेथे काम करणारे असावेत. कारखान्याचे मालक, कच्चा माल आणणारे कारखाना मॅनेजर, विक्री करणारे अशी मोठी टीम त्यासाठी लागते. हे सर्व शोधून त्यांना आरोपी करणे आवश्यक आहे. नकली व विषारी दारुमुळे दरवर्षी शेकडो नागरिकांचे बळी जातात. धुळ्यात देखील एखादी भयंकर घटना घडून मोठ्या संख्येने नागरिकांचे बळी जाण्याची शक्यता आहे. म्हणून पोलिसांनी राजकीय दबावाला भीक न घालता नकली दारुचे रॅकेट संपूर्ण **(पान ४ वर)**

पो.महासंचालक सदानंद दातेच्या हस्ते

## धुळ्याचे मा.सहाय्यक पो.निरीक्षक हेमंत बेंडाळेना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक प्रदान



**धुळे, दि.११- महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या हस्ते सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत विजय बेंडाळे यांना मानाचे मकेंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक (अन्वेषण)फ सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. गुन्ह्यांच्या तपासातील (अन्वेषण) उत्कृष्ट कामगिरी आणि उल्लेखनीय योगदानाबद्दल हा बहुमान त्यांना बहाल करण्यात आला आहे.**

धुळे येथील आझाद नगर पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक ११७/२०२२ मधील प्रकरणात सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत बेंडाळे यांनी अत्यंत कौशल्याने व सखोल तपास केला होता. हा गुन्हा भारतीय दंड संहितेच्या (आय. पी. सी) कलम ४०९, ४०६, आणि महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अन्वये दाखल करण्यात आला होता. अवाजवी व्याजदराने कर्जवाटप करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या रॅकेटचा सपोनि बेंडाळे आणि त्यांच्या पथकाने पर्दाफाश **(पान ४ वर)**

## धुळे शहर पाणी पुरवठा योजनेचे व्हॉल्व जेसीबीने तोडले; चौकशी करा : रघुवंशी



**धुळे, दि.११- अक्कलपाडा धरणातून धुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीवरील दोन वॉल जेसीबीच्या सहाय्याने तोडल्यामुळे शहराचा पाणीपुरवठा बंद झाल्याचा आरोप धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी सार्वजनिक कार्यक्रमात केला आहे.या गंभीर आरोपाची तत्काळ चौकशी करून सत्यता जनतेसमोर आणावी तसेच आरोप तथ्यात्मक असल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करावा. अशा मागणी धुळे शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष आलोक रघुवंशी यांनी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले.**

निवेदनात म्हटले आहे की,अक्कलपाडा धरणातून धुळे शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी ही हजारो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित महत्त्वाची सार्वजनिक मालमत्ता आहे.या जलवाहिनीवरील दोन वॉल जेसीबीच्या सहाय्याने तोडल्याचा आरोप स्वतः आमदारांनी केला असल्याने पोलीस प्रशासनाने या वक्तव्याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे.आमदार अनुप अग्रवाल यांच्या वक्तव्याची व्हिडिओ रेकॉर्डिंग **(पान ४ वर)**

## नंदुरबारला गोमांस विक्री करणाऱ्याचा मुद्देमाल जप्त; संशयितास केली अटक

**नंदुरबार, दि.११ (प्रतिनिधी)- नंदुरबार शहर पोलिसांनी बागवान गल्ली परिसरात कारवाई करत गोवंशीय मांस विक्रीचा पर्दाफाश केला. या कारवाईत सुमारे ४० किलो गोवंशीय मांस, ३ लोखंडी सुरे, २ लोखंडी कुऱ्हाडी आणि १ वजनकाटा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी एका संशयितास ताब्यात घेण्यात आले असून, गोवंशाची कत्तल करून मांस विक्रीसाठी देणाऱ्या दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे.**

दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी नंदुरबार शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना बागवान गल्ली परिसरात गोवंशीय जनावराचे मांस विक्रीसाठी ठेवण्यात आल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने सकाळी सुमारे १०.०५ वाजता शाळा क्रमांक ०९ च्या मागील टेकडीवरील एका खोलीवर छापा टाकला.

यावेळी कुरेशी नुर मोहम्मद शेख रफिक (वय ३०, रा. धानोरा रोड, घोडापीर मोहल्ला, नंदुरबार) हा गोवंशीय मांस **(पान ४ वर)**

प्रा.सी.यु.पाटलांतर्फे

## जवाहर मेडिकलला उपकरणे भेट

धुळे, दि.११- धुळे तालुक्यातील मांडळ येथे ज्येष्ठ नेते निवृत्त प्रा.सी.यु.पाटील यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधुन जवाहर मेडीकल फाऊंडेशनचे एसीपीएम मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटलला रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक प्रयोगशाळा उपकरण भेट दिले. त्यानिमित्ताने जवाहर मेडीकल फाऊंडेशनच्या सभागृहात मा.आ.कुणाल पाटील यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जवाहर मेडीकल फाऊंडेशन मोराणे प्र.ल.धुळेच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांवर मोफत तसेच अल्पदरात खात्रीशीर उपचार केले जातात. तसेच शासनाच्या विविध योजनांचाही लाभ रुग्णांना मिळवून दिला जातो. त्यामुळे रुग्णांची सेवा घडावी म्हणून ज्येष्ठ नेते श्री छबु उत्तमराव पाटील यांनी स्व:ताच्या वाढदिवसानिमित्ताने अत्याधुनिक प्रयोगशाळा उपक्रम भेट दिले आहे. यावेळी झालेल्या कार्यक्रमात मा.आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते **(पान ४ वर)**

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,39,000 रु.+3% GST
सोने- 24 K -1,52,000 रु.+3% GST
चांदी- 2,38,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## महागाई, बेरोजगारी, शेतमजुरांच्या विविध मागण्यांसाठी शहादा येथे जेलभरो आंदोलन

**शहादा, दि.११ (प्रतिनिधी)- शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण कामगारांच्या विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभा, भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) व महाराष्ट्र शेतमजूर व इतर ग्रामीण मजूर युनियन (लाल बावटा) यांच्यावतीने शहादा येथे माकपाचे तालुका सचिव कॉ.सुनील गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली जेलभरो आंदोलन करण्यात आले.**



यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर असलेल्या राष्ट्रीय महामार्गावर आंदोलनकर्त्यांनी सुमारे एक तासापेक्षा अधिक वेळ ठिय्या मांडला शासनाचे **(पान ४ वर)**

## शिंदखेडा तालुक्यातून बैल, शेळ्या लंपास

धुळे, दि.११- शिंदखेडा तालुक्यात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये चोरट्यांनी शेतातून गाय, बैल आणि ३० शेळ्या चोरून नेल्याची घटना घडली. शेवाडे येथील शेतातून नऊ ऑगस्टला सायंकाळी शेतातील दोन बैल चोरट्यांनी नेले. २५ हजार रुपये बैलांची किंमत आहे. याप्रकरणी उमेश बापू दावळे(रा. शेवाडे, ता. शिंदखेडा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार शिंदखेडा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात झाला. अन्य घटनेत माळीच गावातील शेतकरी भीमराव वसंत **(पान ४ वर)**

## गौतम नगरातील मूलभूत सुविधांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; भीम आर्मीचे न.प.ला निवेदन

**नंदुरबार, दि.११ (प्रतिनिधी) - नंदुरबार शहरातील प्रभाग क्रमांक ६, गौतम नगर परिसरातील नागरिकांच्या प्रलंबित मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी भीम आर्मीच्या वतीने नंदुरबार नगरपरिषदेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.**

गौतम नगर परिसरात मागील अनेक वर्षांपासून पिण्याचे पाणी, बोअरवेल, पाणीपुरवठा पाइपलाइन, सार्वजनिक नळ, घरकुल तसेच समाज मंदिराच्या विविध समस्या प्रलंबित आहेत. याबाबत नागरिकांनी यापूर्वी प्रशासनाकडे निवेदने देऊनही प्रश्न सुटले नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. परिसरातील अनेक वर्षांपासून बंद असलेली बोअरवेल तातडीने दुरुस्त करून त्यावर नवीन मोटार बसवावी, तसेच बोअरवेलचे उपलब्ध पाणी पिण्याच्या पाण्यासाठी वापरावे, अशी मागणी करण्यात आली आहे. बोअरवेलचे पाणी नवीन पाणीपुरवठा पाइपलाइनला जोडून बंद असलेली पाइपलाइन पुढे वाढवावी व नागरिकांना नळ कनेक्शन उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी आहे. याशिवाय नागरिकांच्या सोयीसाठी परिसरात २ ते ३ ठिकाणी सार्वजनिक नळ बसवावेत. रमाबाई आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलांचा निधी लाभार्थ्यांना तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी **(पान ४ वर)**

## धुळ्यात अभियंत्यावर प्राणघातक हल्ला

धुळे, दि.११- शहरातील एका अभियंत्यावर दोन जणांनी पूर्ववैमनस्यातून प्राणघातक हल्ला केला. गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून घेतली. महिंदळे शिवारात सुरत वळण महामार्गालगत घटना घडली असून तीन जणांविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला. सिव्हिल इंजिनिअर परेश विजय निळे (३०, रा. महालक्ष्मी कॉलनी, धुळे) यांनी फिर्याद दिली, त्यानुसार रविवारी (ता.९ ) रात्री महिंदळे शिवारात हॉटेल राजगड जवळ पूर्ववैमनस्यातून **(पान ४ वर)**

## धुळे शहरात रिटेल व होलसेल कापडाची मोठी बाजारपेठ : अग्रवाल

**धुळे, दि.११- धुळे क्लॉथ मर्चंट असोसिएशन,धुळे या संघटनेची जनलर सभा गणपती पेलेस येथे सम्पन्न झाली.यावेळी संघटनेतर्फे विद्यार्थीचा गौरव करण्यात आला तसेच ७५ वर्ष जेष्ठसदस्य.जुगलंकिशोर अग्रवाल,(जुगल वस्त्रालय) सुरेशलाल आहुजा, टेकचंद रेलन(आकाशदिप),बादेवराज रेलन,शामलाल मंदान,डॉ.हरीचंद पंजाबी(शुभमंगल)यांचा सत्कार करण्यात आला. सभासदांच्या विविध समस्या दूर करण्यासाठी सर्व कार्य .सदस्यानी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.**

यावेळी बोलताना महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष,ओमश्री ॲग्रोटेकचे संचालक कैलासशेठ अग्रवाल यांनी सांगितले की जसे देशातील तेलाचे हब हे धुळे शहर आहे त्याचप्रमाणे होलसेल,रिटेल, रेडिमेड कापडाची मोठी बाजारपेठ धुळे शहरात आहे. व्यापारी बांधवानी रोज एक तास आपल्या आरोग्यासाठी दिला पाहिजे.अध्यक्ष सुशिल खंडेलवाल यांनी सांगितले की शहरातील सर्व दुकानातील कर्मचारी यांच्या साठी आरोग्य शिबीर,ब्लड डोनेशन केम्पचे लवकरच आयोजन करण्यात येणार आहे. सभेची प्रस्तावना जनलर सेक्रेटरी राजेंद्र पाचपुते यांनी केली संचालक अनिल कटारिया, द्वारका(मुन्नाशेठ)अग्रवाल,गिरीष अग्रवाल, राजकुमार सदाने,प्रल्हाद मंदान,दिपक रुनवाल,सुनिल पंजाबी, राजेंद्र तनेजा, विनोद रेलन,हर्ष रेलन, दिनेश रेलन,सुरेशलाल आहुजा, प्रवावीणकुमार कटारिया,मनीष रेलन,आनंद श्रीश्रीमळ, मनोहरलाल मंदान,दिनेश भंडारी,पंकज कटारिया, मनीष तनेजा, संतोष पिंगळे,कैलास वधवा यांनी परिश्रम घेतले सुत्रसंचलन जगदीश भगत यांनी केले आभारप्रदर्शन प्रल्हाद मंदान यांनी केले.



## जाम जावदे येथे भव्य पुलाचे लोकार्पण भगवान बिरसा मुंडा स्मारकाचे भूमिपूजन

**शहादा,दि.११(का.प्र.)- विश्व आदिवासी दिनाचे औचित्य साधून शहादा तालुक्यातील जाम जावदे येथे परिसराच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या भव्य पुलाचे लोकार्पण तसेच क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मारकाचा भूमिपूजन सोहळा कार्यसम्राट आमदार राजेश पाडवी यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाला.**

या सोहळ्याला भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा. मकरंद पाटील, शहादा नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षा माधवी मकरंद पाटील, भाजपा महिला आघाडी प्रमुख समिधा नटावदकर, सिताराम पावरा, शहादा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील, म्हसावदचे एपीआय रमेश वावरे, सुभाष वाघ आणि डॉ. विजय चौधरी यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर, लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमा दरम्यान आमदार राजेश पाडवी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना **(पान ४ वर)**

आपला महाराष्ट्र

# धुळे : सुनियोजित शहर इतिहास जमा

धुळे जिल्ह्याचा इतिहास जेवढा जाज्वल्य आणि सकारात्मक आहे तेवढाच तो नकारात्मक आणि उबग आणणारा आहे.ज्या कारणांनी धुळे शहर आणि जिल्हा बदनाम झाला त्यांची उजळणी करण्याचे कारण नाही.तो इतिहास सर्वांच्या पचनी आणि अंगवळणी पडलेला आहे.बदनामीची जी कारणे आहेत त्याबद्दल कुणालाच पश्चात्ताप होत नाही.त्यामुळे दुरूस्तीची शक्यता नाही.परिणामी ती प्रक्रिया पुढे चालूच आहे.सकारात्मक तसेच अभिमान वाटावा अशी काही प्रेरणा स्थळे आहेत काही घटनाही आहेत पण त्या सध्याच्या वातावरणात झाकोळून जाव्यात इतके वातावरण बिघडलेले आहे. देशातील पहिले सुनियोजित रचनेचे शहर म्हणून धुळे शहराचा उल्लेख होतो. तशी वर्णने उपलब्ध आहेत. सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी धुळे शहराची रचना केलेली आहे. लांबच लांब गल्ल्या आणि एकमेकांना छेदणारे रस्ते, त्या पद्धतीची चौक, एका दिशेला उभे राहिल्यास शहर संपेपर्यंतच्या दिशेपर्यंत चा माणूस दिसेल अशी पारदर्शक रचना या शहराची होती. त्या रचनेला छेद देणारी चुकीची व्यवस्था प्रस्थापित करण्यास इथल्या लोकांनी भरपूर हातभार लावला. त्यात जबाबदार अनेक लोक आहेत. लोकप्रतिनिधी आहेत, प्रशासकीय अधिकारी आहेत, नागरिकांमधील जबाबदार घटक आहेत अशा सर्वांनी अतिशय सुंदर अशा या शहराचा चेहरा मोहरा बदलून टाकण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे सध्याच्या काळात एक विद्रूप आणि बेशिस्त शहर म्हणून आपली नोंद झालेली आहे.

नव्या वस्त्या अडप झडप वाढल्या. शेती खरेदी करून ती बिनशेती करण्यात अनेकांनी पुढाकार घेतला. अधिकाऱ्यांना हाताशी धरून अशा पद्धतीने वसाहती निर्माण केल्या की एका बाजूने प्रवेश करून दुसऱ्या बाजूनेच निघावे लागेल. मध्ये कुठेच छेद नाही. रस्ता नाही अशा सर्वच वसाहतीची रचना आहे. अनेक वसाहती तयार होऊन ४०-४५ वर्षे झाली तरीही रस्ते नाहीत, एक विजेचा दिवा बंद पडला म्हणजे किमान तीन महिने तो सुरू होत नाही. पाण्याचे कधीच नियोजन नसते. ठिकठिकाणी प्रत्येक वसाहतीत कचऱ्याचे ढीग पडलेले असतात. केव्हातरी ते उचलले जातात. तक्रार कोणाकडे करायची. हा प्रश्नच आहे. मुख्य शहरातील अवस्था देखील यापेक्षा वेगळी नाही. प्रत्येक परिसरात जुनी आणि नवी प्रस्थापित झालेली अतिक्रमणे आहेत. ती कितीही वेळा काढली आणि पर्यायी व्यवस्था निर्माण केली तरी पुन्हा त्याच ठिकाणी आम्ही राहणार आहोत असा अट्टाहास त्या त्या अतिक्रमण वसाहतीतील लोकांचा असतो. त्यांना प्रोत्साहन देणारे आणि त्यांचे पुढारपण करणारे अनेक आहेत. ही अतिक्रमणे प्रशासनाने हटवावीत अशी सर्वांची अपेक्षा असते. शहराचे रखवालदार किंवा ज्यांना लोकप्रतिनिधी म्हणतात ते ही जबाबदारी घेत नाहीत. त्यांना निवडून यायचे असते. मते हवी असतात. म्हणून लोकानुनय हा त्यांचा स्थायीभाव असतो. काही वेळा शहर स्वच्छ करण्याचे निर्णय घेतले जातात. त्याची अंमलबजावणी प्रशासन करते. त्याचा मोठा गाजावाजा होत असतो. परंतु परिस्थिती पूर्ववत होत जाते कारण संरक्षण देणारे त्याच्या पाठीमागे असतात. शिवाय सोयीचे असते तेवढे अतिक्रमण काढले जाते. ज्यांचे उपद्रव मूल्य आहे त्यांना हात लावण्याची हिंमत कोणाचीच नसते.

या सर्व परिस्थितीमुळे धुळे शहर हे बकाल शहराच्या यादीत जाऊन पोहोचले आहे. शहरातील अतिक्रमणांचा तपशील देण्याची आवश्यकता नाही. तो सर्वांना माहिती आहे. शहराचा मास्टर प्लॅन तयार आहे पण त्यानुसार अंमलबजावणी कधीच होत नाही. ती होणार नाही याची काळजी घेतली जाते. शिवाय ज्याच्या हाती ससा तो शिकारी अशी अवस्था किंवा मानसिकता असल्यामुळे शहराचा चेहरा मोहरा दुरुस्त होण्याची शक्यता आता तरी दिसत नाही. वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव अशा राजवटी खानदेशात आणि धुळे जिल्ह्यात नांदल्या. नंतर मोगलांचे राज्य आले. त्यानंतर मराठा साम्राज्य आले. नंतर ब्रिटिश आले. ब्रिटिशांनी पूर्व आणि पश्चिम खानदेश अशा दोन जिल्ह्यांची निर्मिती केली. पश्चिम खानदेश म्हणजे धुळे जिल्हा होय. त्याचे मुख्यालय म्हणून धुळे शहराची रचना पहिला ब्रिटिश कलेक्टर कॅप्टन ब्रिक्स याने केली. विश्वेश्वरय्या यांनी त्याची रचना करून दिली. मोगलाई जुने धुळे आणि देवपूर ही तीन वेगवेगळी पांझरा काठची महसुली गावे जोडून शहराची स्थापना करण्यात आली. अनेकांनी जयपूर शहर बघितले असेल. जुन्या पिढ्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात लाहोर बघितले असेल पण फाळणी झाल्यानंतर लाहोर पाकिस्तानात गेल्यामुळे हे शहर बघण्याचे काही कारण नाही. म्हणून जयपुर शहराचा आदर्श आपल्या समोर आहे. या शहराची जी रचना आहे त्याच पद्धतीची रचना धुळे शहराची आहे. असे असले तरी धुळे शहर सुनियोजित रचनेचे शहर म्हणून देशातील पहिले आहे असा उल्लेख इतिहासात आढळतो. म्हणजे लाहोर आणि जयपुर ची निर्मिती त्या नंतरची आहे. एवढे सगळे वैभव असताना आपण त्याचा पार भुगा करून टाकलेला आहे. पण त्याबद्दल आपल्याला काहीही खंत वाटत नाही.

१८१८ ते २०२६ पर्यंत शहराच्या मध्य भागातून वाहत गेलेल्या पांजरा नदीचे दोन्ही बाजूंनी सुशोभीकरण करावे असे माजी आमदार अनिल गोटे यांचा अपवाद वगळता कुणालाही वाटले नाही. डॉक्टर रा.भ. चौधरी नगरपालिकेचे अध्यक्ष असताना त्यांनी गणपती पुलाजवळ बंधारा बांधणे, दोन्ही काठ सुशोभित करणे, आणि बोटिंग सेवा सुरू करणे. दोन्ही बाजूंनी बागांची निर्मिती करणे अशी मोठी योजना आखली होती. ती आकाराला येऊ शकली नाही कारण त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणून त्यांना पाय उतार करण्यात आले होते. त्या काळात अनेक दृष्टिकोन असलेले नगराध्यक्ष शहराला लाभले होते. डॉक्टर चौधरी यांच्या काळातील सिमेंट रस्ते आणि भूमिगत गटारी आजही त्यांच्या कामगिरीची साक्ष देतात. सिमेंट रस्ते आजही होतात. पण एका वर्षाच्या आत त्याचे मातेरे होते आणि नंतर पुन्हा नव्या रस्त्याचे बजेट तयार केले जाते. पुन्हा पुन्हा बजेट, पुन्हा पुन्हा रस्त्यांची निर्मिती कशासाठी होते ते वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. आता पुतळ्यांची शहरात फार गर्दी आहे पण ज्या महापुरुषांचे हे पुतळे आहेत त्यांची जीवन शैली,पराक्रम आणि विचार वैभवाशी कुणालाच काही घेणे देणे नाही.त्यांच्या विचारांशी एखाद्या टक्क्याची बांधिलकी आहे असे एखादे उदाहरण शोधूनही इथे सापडणार नाही.तरीपण महापुरूषांच्या पुतळ्यांचा सोस जाता जात नाही.वाहतुकीचा कुठेच ठिकाणा नाही.रस्त्याने धड पायी चालण्यात देखील मोठा धोका आहे.केव्हा कुठे कसा अपघात होईल सांगता यावयाचे नाही.बेशिस्त वाहतूक हे धुळेकरांना लाभलेले भागध्येय म्हणावे लागेल. शहरातील आडव्या उभ्या गल्ल्या शेवटचा श्वास घेत आहेत.जुन्या आग्रा रोडचा कचरा झाला. वाहनांची प्रचंड गर्दी झाल्याने एकाही दुकानाला पार्किंग नाही.महानगर पालिकेच्या मालकीचे किंवा खाजगी क्षेत्रातील वाहन पार्किंग नाही.ते तयार करावे आणि मध्यवर्ती ठिकाणी मोठे पार्किंग असावे असे कुणालाही वाटले नाही याचे आश्चर्य वाटते.पैसे टाकून इमारत उभी करून पार्किंग मधून पैसे कमविणे काहींना मान्य नसावे कारण इझी मनीची सवय झाली आहे.दूरदृष्टिचा अभाव असल्याने आग्रारोडचे भंगारीकरण झाले.दुकानात शिरायला जागा नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे.एक माणूस एक वाहन यामुळे अशी स्थिति निर्माण झाली आहे.या अवस्थेतून शहराला बाहेर काढण्यासाठी सामायिक नेतृत्व हवे ते नाही. त्याचा अभाव आहे.विभाजनवादाची भूमिका असे नेतृत्व देऊ शकत नाही.या सर्व परिस्थितीवर नियंत्रण असलेली किंवा निरीक्षकांची भूमिका बजावत मार्ग दाखविणारी माध्यमे स्वस्थ बसून रवंथ करीत आहेत.यातून शहराचे तीन तेरा वाजले आहेत.ते पूर्ववत होण्याची शक्यता दिसत नाही.परिणामी सुनियोजित रचनेचे धुळे शहर इतिहास जमा झाले आहे.

## म.फुले एम.एस.डब्ल्यू. महाविद्यालयात आदिवासी दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**तळोदा, दि.११(प्रतिनिधी)- जागतिक आदिवासी दिनाच्या औचित्य साधून महात्मा फुले एम.एस. डब्ल्यू. व बी.एस.डब्ल्यू. महाविद्यालयाच्या वतीने जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आदिवासी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाबाबत मान्यवरांनी मार्गदर्शन केले.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व परिचय करण्यात आला. त्यानंतर भगवान बिरसा मुंडा व ख्वाजा नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून सुमित्रा वसावे तसेच अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. निलेश गायकवाड उपस्थित होते. यावेळी अ.शी. मंडळाचे कार्यकारी सदस्य मा. अरविंद माळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे मार्गदर्शक मा. सुमित्रा वसावे यांनी जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.आदिवासी समाज हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक असून त्यांची समृद्ध परंपरा, भाषा, कला व संस्कृतीचे जतन करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. आदिवासी युवकांना शिक्षण, रोजगार, कौशल्यविकास व विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी सातत्याने प्रयतक होणे आवश्यक आहे. आदिवासी संस्कृतीची जतन तसेच आदिवासी संस्कृतीचे संक्रमण समाज हितासाठी आवश्यक आहे तसेच प्रत्येक आदिवासीने समाज हितासाठी पुढे आले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नितीन तायडे यांनी केले. दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस जगभरात जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा केला जातो हा दिवस आदिवासी बांधवांच्या सांस्कृतिकचा गौरव करण्यासाठी त्यांच्या हक्काची जोपासना करण्यासाठी आणि निसर्गाशी असलेल्या त्यांच्या जीवन संबंधाची आठवण ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन केले.सदर कार्यक्रम प्रसंगी एम एस डब्ल्यू च्या विद्यार्थ्यांनी आदिवासी हक्क जाणीव जागृती संदर्भात पथनाट्य सादर केले तसेच विविध पोस्टर प्रदर्शना मार्फत आदिवासी संस्कृतीला उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. निलेश गायकवाड यांनी अध्यक्षीय भाषणात आदिवासी



व निसर्गाशी असलेले नाते या संदर्भात मनोगत व्यक्त केले. आपल्या देशाच्या जडणघडणीत आदिवासी संस्कृतीचा मोठा वाटा आहे, आपण सर्वांनी त्याचा आदर केला पाहिजे. आदिवासी समाजाच्या विकासासाठी शिक्षण, सामाजिक जागृती आणि युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शनात प्रा.डॉ.प्रमोद जाधव यानी आदिवासी युवकांच्या समस्या, गरजा व आकांक्षा यांवरही दृष्टिक्षेप टाकला. शिक्षणाच्या माध्यमातून युवकांना मुख्य प्रवाहात आणतानाच त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचा व सांस्कृतिक वारशाचा सन्मान राखला पाहिजे, असे मत व्यक्त करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. नितीन तायडे व आभार प्रदर्शन प्रा. डॉ.प्रमोद जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ . निलेश गायकवाड, प्रा. उषा वसावे, प्रा. नितीन तायडे, प्रा. डॉ.प्रमोद जाधव, प्रा. रामचंद्र परदेशी, प्रा. सक्हेल गावित, प्रा. गोपिका वळवी तसेच प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थीची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## श्रीकृष्ण माध्य.विद्या.त सीडबॉल उपक्रम संपन्न

शहादा, दि.११(प्रतिनिधी)- तालुक्यातील फेस येथील श्रीकृष्ण माध्यमिक विद्यालयात इको क्लब व हरित सेनेअंतर्गत सीडबॉल उपक्रम उत्साहात राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत इको क्लबचे शिक्षक खगेन्द्र कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध प्रजातींच्या बिया गोळा करून त्यापासून सीडबॉल तयार केले. तयार करण्यात आलेले सीडबॉल शालेय परिसर तसेच गावातील मुख्य रस्त्यांच्या परिसरात वितरित करण्यात आले. त्याचबरोबर विविध ठिकाणी वृक्षारोपणही करण्यात आले. पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि जैवविविधतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, तसेच परिसरात अधिकाधिक वृक्षांची निर्मिती व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

यावेळी मुख्याध्यापक किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण होऊन निसर्ग संवर्धनाची भावना अधिक दृढ झाली.

## दराने येथे जप्त वाळूसाठ्याचे घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाटप; कुटुंबांना दिलासा

शिंदखेडा/दराने, दि.११ (प्रतिनिधी)- महसूल विभागामार्फत मौजे दराने येथे जप्त करण्यात आलेला वाळूसाठा घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाटप करण्यात आला. शिंदखेडा तालुक्याचे तहसीलदार नितीनकुमार देवरे यांच्या आदेशानुसार दि.७/८/२०२६ रोजी हे वाटप पार पडले. या उपक्रमामुळे गावातील तब्बल घरकुल लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून प्रत्येकी ५ ब्रास याप्रमाणे मोफत वाळू देण्यात आली आहे.




महसूल विभागाने २८ जुलै २०२६ रोजी दराने शिवारात बेकायदेशीर साठवून ठेवलेला सुमारे ब्रास वाळूसाठा जप्त केला होता. महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनेचा रीतसर पंचनामा करून तो तहसील कार्यालयात जमा केला होता. त्यानंतर हा वाळूसाठा सुरक्षिततेसाठी स्थानिक पोलीस पाटील व कोतवाल यांच्या ताब्यात देण्यात आला होता. गावातील गरीब व गरजू घरकुल लाभार्थ्यांची वाळूची अडचण लक्षात घेऊन तहसीलदार नितीनकुमार देवरे यांनी या जप्त साठ्याचा वापर घरकुल बांधकामासाठी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शासकीय नियमानुसार प्रक्रियेचा पाठपुरावा करून १४ लाभार्थ्यांना मोफत वाळूचा ताबा देण्यात आला. वाळू वाटपप्रसंगी चिमठाणे मंडळाच्या मंडळ अधिकारी मीना पवार, दराने येथील ग्राम महसूल अधिकारी गौरी पाटील, सरपंच भूरया वेडू भिल, पोलीस पाटील जितेंद्र पवार, महसूल सेवक नानाभाऊ भिल तसेच रोजगार सेवक तुषार पवार आणि लाभार्थी उपस्थित होते.


प्रकाश में आज घमंडी साऊथ मुवी




विजय थलपती जेनेलिया डिसूजा जयम रवि बिपाशा बसू प्रकाश राज सयाजी शिंदे सदाशिव प्रेमी अमान










### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो., ज्युनी.डिव्ही., यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.६६८/२०२६, नि.६,
नि.नं. चौ.ता.१४/८/२०२६

१) राजेंद्र पंढरीनाथ तिरमले, २) सुकलाल पंढरीनाथ तिरमले,
३) मंगलबाई पंढरीनाथ, सर्व रा.अर्थे खु., शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

कस्तुराबाई पंढरीनाथ तिरमले,
मयताचा पत्ता- अर्थे खु., ता.शिरपूर, जि.धुळे,
मृत्यू दि.०७/०४/२०२६. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ३ यांची आई नामे कस्तुराबाई पंढरीनाथ तिरमल ह्या दि.०७/०४/२०२६ रोजी सिध्दीविनाय हॉस्पीटल, शिरपूर, जि.धुळे येथे उपचार घेत असतांना मयत झालेल्या आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.१४/०८/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनीधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात यईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरुन प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार व सर्व संबंधितीयांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे, पो. तु. ता. धुळे पैकी धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे वलवाडी, ता. जि. धुळे हद्दीतील स.नं. ४१/२+५० पैकी प्लॉट नं. ८३ क्षेत्र ३५०० चौ. फुट सुमारे ३२५.१६ चौ. मी. बखळ प्लॉट यास विस्तारीत सि.स.नं. १२३०चे एकूण क्षेत्र ३१८.५० चौ. मी. सत्ता प्रकार क बखळ प्लॉट सदरील प्लॉट मिळकतीच्या चतु:सिमा खालील प्रमाणे.

| दिशा | | चतु:सिमा | |
|---|---|---|---|
| पुर्वेस | : प्लॉट नं. ८४, | पश्चिमेस | : ४० फुट रस्ता |
| दक्षिणेस | : १५ फुट रस्ता | उत्तरेस | : प्लॉट नं. ६७ |

येणे प्रमाणे मिळकतीचे मालक श्री. शरद राजाराम काळे रा.नवी मुंबई (मुंबई) हे असून त्यांनी आमचे पक्षकार यांच्या सोबत कायम विक्रीचा सौद केला असून बयाणा पोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे पक्षकार सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

सदर मिळकत बाबत कोणाचे काही हक्क, हितसंबंध, तारण, गहाणखत, सौदा पावती, बोजा,मुखत्यारपत्र, बक्षिसपत्र, तसेच इतर काही हक्क, हितसंबंध अगर तक्रार असल्यास, मुळ कागदपत्रा सोबत आपली लेखी हरकत ७ (सात) दिवसाच्या आत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील दिलेल्या पत्त्यावर कळवावे. नियोजित कालावधीमध्ये कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे पक्षकार सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर हरकत आमच्या पक्षकारावर व प्रस्तुत मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच परस्पर वर्तमानपत्रात हरकत घेतल्यास ती देखील आमच्या पक्षकारावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व दस्त ऐवजावरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. ठिकाण : धुळे दि. ११/०८/२०२६

**ॲड.राहूल एफ. पाटील**
(नोटरी भारत सरकार)
निवास/कार्यालय, प्लॉट नं. १, एस. आर. पी. एफ. कॉलनी, नकाणे रोड, देवपूर धुळे मो. नं. 9921221910

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनी.डिव्ही., यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.६९६/२०२६, नि.६,
नि.नं. चौ.ता.२८/८/२०२६

१) प्रमिला तुकाराम पाटील,
रा. प्लॉट नं.१८, निळकंठेश्वर मंदिरासमोर, आमोदे, ता.शिरपूर, जि.धुळे.
२) सोनाली नारायण पाटील, ३) ओम नारायण पाटील,
४) आर्यन नारायण पाटील, नं.२ ते ४ रा. प्लॉट नं.१८, निळकंठेश्वर मंदिरासमोर, आमोदे, ता.शिरपूर, जि.धुळे. ह.मु. फ्लॅट नं.२०३, श्री मच्छी महाराज अपार्टमेंट, बरूडीया शेरी, कठरीया, नानी दमण ॲण्ड दिव, ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

नारायण तुकाराम पाटील, मयताचा पत्ता- प्लॉट नं.१८, मिळकंठेश्वर मंदिरासमोर, आंमोदे, ता.शिरपूर, जि.धुळे,
मृत्यू दि.०५/०४/२०२१. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचा मुलगा, अर्जदार नं.२ यांचे पती, अर्जदार नं.३ व ४ यांचे वडील नामे नारायण तुकाराम पाटील हे दि.०५/०४/२०२१ रोजी वापी मल्टी स्पेशिलिटी हॉस्पीटल, वापी, जि. वलसाड येथे उपचार घेत असतांना मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.२८/८/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनीधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरुन प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.दिवाणी जज्ज सो., ज्युडी यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.६९०/२०२६, नि.६,

अंकुश धनराज शिरसाठ (कोळी) वगैरे ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

ज्या अर्थी अर्जदार न.१ व २ हे मयत न.१) कै.धनराज हरचंद कोळी यांचे कायदेशीर वारस असून मयत मयत न.१) कै.धनराज हरचंद कोळी यांचा ०९/०३/२०२३ रोजी झाला आहे. तसेच त्यांची पत्नी मयत न.२) कै छांया उर्फे सुनिता धनराज कोळी हिचा मृत्यू ता.८/११/२०२० रोजी झाला आहे. तसेच मयत न.१ याची आई म्हणजेमयत न.३) कै.धृपदाबाई हरचंद कोळीचामृत्यू तारीख ०८/११/२०२१ रोजी झाला आहे. अर्जदार आणि मयत हे मुळचे उंटावद ता शिरपूर जिल्हा धुळे येथे राहत होते म्हणून मयत न.१) कै.धनराज हरचंद कोळी यांचे अर्जदार न.१ व २ हे कायदेशीर वारस असून अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असलेने अर्जदार यांने बॉम्बे रेगुलेशान कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी/वारसांचे प्रमाणपत्र मिळणे बाबतअर्ज केला आहे.

त्या अर्थी या नोटीसीने तमाम जनतेस कळविणेत येते कि, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदार यांचे व्येतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे.न्यायालयात हि नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आत अगर दिनाक २२/८/२०२६ रोजी ठीक सकाळी १०.३० वा स्वत अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फतहजर राहून लेखी स्वरूपात हरकती सादर करावे अन्यथा सदरील अर्जदार यांचा तोंडी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदार यांचे व्यतिरिक्त दुसरे कोणीच मयताचे वारस नाहीत. असे गृहीत धरण्यात येवून, अर्जदार यांना मागणी प्रमाणे वारस प्रमाण पत्र देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही मे.न्यायाधीश सो कनिष्ट स्तर शिरपूर जिल्हा धुळे यांचे आदेशावरून सदरची नोटीस प्रसिद्धीस दिली असे.

आज रोजी माझ्या साहिनी व कोर्टाचे शिक्कायानिशी प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील दिवाणी न्यायाधिश सो., कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात**

दि.कि.अर्ज नं.६६६/२०२६, नि.६,

सोमा जगन्नाथ भामरे वगैरे ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

X

पार्वताबाई सोमा भामरे,
मयताचा पता रा.थाळनेर, ता.शिरपूर, जि.धुळे.
मृत्यू दिनांक- १५/०५/२०२५ ....मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे.शिरपूर न्यायालयात पार्वताबाई सोमा भामरे ह्या दिनांक १५/०५/२०२५ रोजी थाळनेर, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झाले. त्यामुळे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावायचा असल्यास त्यांनी दिनांक १४/८/२०२६ रोजी ठीक सकाळी १०:३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक ३०/७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरून

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील दिवाणी न्यायाधिश सो., कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात**

दिवाणी कि.अर्ज नं.७२६/२०२६, नि.६,

१) भिवा रामदास भिल, रा.सुळे ता.शिरपूर, जि.धुळे,
२) मोनी नाना भिल,
रा.पंडीतपाडा पो.वरझडी ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार भिवा रामदास भिल वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे रामदास महारु भिल हे दि.१५/०१/२०२३ रोजी मौजे सुळे ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे रामदास महारु भिल यांचे वारसांबाबत वर नमुद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.४/९/२०२६ रोजी ठिक १०:३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजुर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरून

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.६८१/२०२६, नि.७,

१) लिलाबाई हिरामण कोळी, २) नंदलाल हिरामण कोळी,
३) चंद्रकांत हिरामण कोळी (मयत),
३-अ) अनिताबाई चंद्रकांत कोळी,
३- ब) प्रशांत चंद्रकांत कोळी, ३-क) प्रमोद चंद्रकांत कोळी,
अ.नं.३-अ ही स्वत:साठी व अ.नं.३-क ची
अ.पा.क आई म्हणून.
सर्व रा.खामखेडा प्र.आंबे ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार लिलाबाई हिरामण कोळी वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे हिरामण रामसिंग कोळी हे दि.०५/११/२०१९ रोजी मौजे खामखेडा प्र.आंबे ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे हिरामण रामसिंग कोळी यांचे वारसांबाबत वर नमुद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.२९/८/२०२६ रोजी ठिक १०:३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजुर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो., ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.६६९/२०२६, नि.६,
नि.नं. चौ.ता.२७/८/२०२६

१) राजीबाई जगन्नाथ बारी, २) छायाबाई दिलीप बारी,
३) गिरीश दिलीप बारी, नं.१ ते ३ रा. तारण तारण जैन मंदिराजवळ, पुरा गल्ली, खालचे गाव, शिरपूर, जि.धुळे.
४) जयश्री संदीप सौपुरे, रा.५५, वल्लभनगर, पटनी पेलस, मालेगाव रोड, धुळे, जि. धुळे.
५) मोनिका प्रशांत बारी, रा.पारधीपुरा, जैन मंदिराजवळ, शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही. ....जाबदेणार

दिलीप जगन्नाथ बारी, मयताचा पत्ता- तारण तारण जैन मंदिराजवळ, पुरा गल्ली, खालचे गाव, शिरपूर, जि.धुळे.
मृत्यू दि.०४/०१/२०१३. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचा मुलगा, अर्जदार नं.२ यांचे पती व अर्जदार नं.३ ते ५ यांचे वडील नामे दिलीप जगन्नाथ बारी हे दि.०४/०१/२०१३ रोजी मौजे शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ५ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.२७/०८/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरुन प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## पान १ वरुन

### भुकंपात दोनशे चोवीस ठार

भूकंपाचा परिणाम झाला आहे.बचावकार्याला वेग भूकंपानंतर प्रशासनाने बचाव आणि मदतकार्याला वेग दिला आहे. ढिगाऱ्यांखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्यासाठी आपत्कालीन पथके, पोलिस आणि स्वयंसेवक कार्यरत आहेत. जखमींना रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात येत असून, बाधित भागांमध्ये मदत पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कोलंबियन रेड क्रॉसची पथकेही मदतकार्यात सहभागी झाली आहेत. भूकंपामुळे झालेल्या जीवित व वित्तहानीचा नेमका आकडा निश्चित करण्याचे काम सुरू आहे. ढिगारे हटविण्याचे आणि बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याने मृतांची संख्या वाढण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. बचाव पथकांनी रात्रभर उत्खनन यंत्रांच्या (एक्स्कॅव्हेटर्स) आणि हातांच्या साहाय्याने वाचलेल्यांचा शोध घेतला. रुग्णालयाचे संचालक इर्न टोरेस कॅस्ट्रो यांनी कॅराकोल टेलिव्हिजनला सांगितले की, बालरोग विभागासह रुग्णालयाचे अनेक वरचे मजले कोसळले. ज्यामुळे काही रुग्ण अडकले आणि रुग्णांवर ढिगाऱ्यांनी भरलेल्या रस्त्यावर उपचार करण्याची वेळ आली.

राष्ट्रीय आपत्ती जाहीर

या भीषण आपत्तीनंतर कोलंबिया सरकारने राष्ट्रीय आपत्ती घोषित केली आहे. बचाव आणि मदतकार्याला प्राधान्य देण्यात आले आहे. बाधित भागातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याबरोबरच जखमींवर तातडीने उपचार करण्यावर प्रशासनाचा भर आहे. कोलंबियाच्या पश्चिम भागात मंगळवारी बचावकार्याचा दुसरा दिवस होता, यात आपत्कालीन पथके कोसळलेल्या इमारती आणि जमीनदोस्त झालेल्या घरांच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या किंवा जिवंत असलेल्या लोकांचा शोध घेत होती. गेल्या काही दशकांतील या सर्वात शक्तिशाली भूकंपामुळे बळी गेलेल्यांची संख्या आणखी वाढू शकते, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. कारण बचाव पथके आता अधिक बाधित क्षेत्रांपर्यंत पोहोचत असून नुकसानीची व्याप्ती तपासली जात आहे. ही आपत्ती गरीब असलेल्या चोको प्रदेशात आली आहे. ज्याचा बराचसा भाग घनदाट जंगलाने व्यापलेला आहे. तिथे फक्त बोटीने किंवा विमानानेच पोहोचता येते. येथील दुर्गम भूभाग आणि मर्यादित पायाभूत सुविधांमुळे बचाव कार्यात अडथळा येऊ शकतो आणि अधिकाऱ्यांसाठी नुकसानीची व जीवितहानीची संपूर्ण व्याप्ती निश्चित करणे आव्हानात्मक ठरू शकते.

### गोळीबाराचा आदेश कुणाचा

भूमिका मांडली. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला काँग्रेसचा पाठिंबा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, राहुल गांधींच्या भूमिकेवरून भाजपनेही काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे. संसदेत कामकाज ठप्प करण्यासाठी विरोधक जबाबदार असल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला. राहुल गांधी सरकारसोबत अर्थपूर्ण चर्चेपासून दूर जात असल्याचा दावा भाजप नेत्यांनी केला. संसदेतील गतिरोध कायम झारखंडमधील विद्यार्थी आंदोलन आणि पोलिस कारवाईच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संघर्ष वाढला आहे. सरकारने गृहमंत्री अमित शहा यांच्या निवेदनाची तयारी दर्शवली असली तरी विरोधकांच्या मागण्यांमुळे संसदेतला गतिरोध कायम आहे. या पार्श्वभूमीवर राहुल गांधींच्या भूमिकेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### महापालिकेतर्फे हर घर तिरंगा रॅली

गेले. रॅलीच्या अग्रभागी अग्निशमन दलाचे जवान विशेष बाईकसह पूर्ण गणवेशात सहभागी झाले होते. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करताना देशभक्तीपर गीतांचा निनाद आणि तिरंग्याने सजलेल्या दुचाकींची भव्य मिरवणूक नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरली. मार्गातील विविध राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.समारोपप्रसंगी राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. यावेळी महापौर मायादेवी परदेशी यांनी प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर अभिमानाने तिरंगा फडकवून या अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. तसेच तिरंगा ध्वज इतिहास फाळणीची भयावहता वंदे मातरम निर्मिती या विषयावर प्रदर्शित करण्यात येणाऱ्या चित्ररथाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या रॅलीत उपायुक्त हेमंत निकम, सहाय्यक आयुक्त डॉ. सोनाली देवरे, नगरसेवक ललित माळी, कृपेश नांद्रे, ओमप्रकाश खंडेलवाल, डॉ. सरफराज अन्सारी, महादेव परदेशी, प्रफुल्ल पाटील यांच्यासह धुळे महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, नर्सिंग स्टाफ तसेच मोठ्या संख्येने नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

### बनावट व शरीराला घातक दारु..

जिल्ह्यातून उध्वस्त करावे. या गुन्ह्यात असलेली पूर्ण गुन्हेगारांची टोळीवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी शिवसेना उबाठाचे अतुल सोनवणे, शाना सोनवणे, नरेंद्र परदेशी, निंबा मराठे, प्रशांत भदाणे, धिरज पाटील, डॉ.अनिल पाटील, ॲड.भुषण पाटील, बाबाजी पाटील, हेमराज पाटील यांनी केली आहे.

### नंदुरबारला गोमांस विक्री..

विक्री करताना आढळून आला. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून ४० किलो मांस, ३ लोखंडी सुरे, २ लोखंडी कुऱ्हाडी आणि १ वजनकाटा जप्त केला.प्राथमिक चौकशीत सदर मांस सलीम मुसा उर्फ सल्या (रा. कुरेशी मोहल्ला, नंदुरबार) याने गोवंशाची कत्तल करून विक्रीसाठी दिल्याचे, तर कुरेशी नुर मोहम्मद शेख रफिक याने ते विक्रीसाठी घेतल्याचे समोर आले आहे. कत्तल करणाऱ्या आरोपीचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.याप्रकरणी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ चे कलम ५, ५(क), ९(अ) तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक भुणेश मराठे, अमोल देशमुख, पोलीस कॉन्स्टेबल राहुल राठोड, अमित भरवाड, ललित गवळी, महिला पोलीस कॉन्स्टेबल निंबाबाई वाघमोडे आणि पोलीस पथकाने केली.अवैध कृत्यांविरुद्ध नंदुरबार शहर पोलिसांची कारवाई यापुढेही सुरू राहणार असून, परिसरात घडणाऱ्या संशयास्पद अथवा अवैध प्रकारांची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

### केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक प्रदान

केला. तपासादरम्यान एकाच वेळी विविध ठिकाणी धाडी टाकून सोने-चांदीचे दागिने, रोख रक्कम, संगणक संच आणि आर्थिक व्यवहारांची महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली. सपोनि हेमंत बेंडाळे यांच्या या प्रभावी तपासाने आर्थिक गुन्हेगारीवर कठोर प्रहार करत पोलीस दलासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. या विशेष कामगिरीची दखल घेत त्यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकाने गौरविण्यात आले. या सोहळ्यास पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. सपोनि बेंडाळे यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### जवाहर मेडिकलला उपकरणे भेट

प्रा.श्री सी.यु.पाटील यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या सचिव डॉ.ममताताई पाटील,अधिष्ठाता डॉ.नितीन पाटील, डॉ.दिलीप पाटील,डॉ.संदिप पाटील, बाजार समितीच्या संचालक सौ.नयनाताई पाटील,बाजार समितीचे माजी सभापती बाजीराव पाटील, पं.स.चे माजी सभापती भगवान गर्दे,खरेदी विक्रीचे माजी चेअरमन लहू पाटील, बाजार समितीचे सभापती योगेश पाटील, उपसभापती संभाजी राजपूत, माजी उपसभापती एन.डी.पाटील, खरेदी विक्रीचे चेअरमन पंढरीनाथ पाटील,जि.प.चे माजी सभापती संग्राम पाटील,माजी सभापती कैलास पाटील,माजी सरपंच सोमनाथ पाटील,माजी सरपंच पांडूरंग मोरे,सरपंच रविंद्र पाटील,संचालक विश्वास शिंदे,ज्येष्ठ नेते धनराज पाटील,माजी सरपंच संतोष पाटील,हिरामण पाटील आदी उपस्थित होते.

# सोनगीर परिसरातील एकल महिला सक्षमीकरण कार्यशाळा संपन्न

**सोनगीरदि. ११(प्रतिनिधी)- महाराष्ट्र व केंद्र शासनाच्या महिला सक्षमीकरण धोरणांतर्गत, उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (तालुका व जिल्हा व्यवस्थापन कक्ष) आणि जोशाबा सांस्कृतिक क्रीडा मंडळ, सोनगीर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सोनगीर येथे जिल्हास्तरीय एकल महिला सक्षमीकरण कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेस सोनगीर परिसरासह नेर, लामकानी, निमडाळे, कापडणे, मुकटी आणि फागणे प्रभागातील ५०० हून अधिक विधवा, परित्यक्ता, एकल व निराधार महिला उपस्थित होत्या.**



शासनाच्या धोरणानुसार अनेक एकल महिला विविध संसाधने व शासकीय योजनांपासून वंचित राहतात. या महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महसूल विभाग, जिल्हा कौशल्य व रोजगार विभाग, जिल्हा उद्योग केंद्र, कृषी विभाग आणि खादी ग्रामोद्योग विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती या वेळी देण्यात आली. जिल्हा अभियान व्यवस्थापक उद्धव धारणे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जिल्ह्यात सद्य:स्थितीत १५००० बचत गट असून त्यात ३८०० एकल महिला समाविष्ट आहेत. मात्र, अद्यापही ज्या एकल महिला बचत गटात सहभागी झालेल्या नाहीत, त्यांनी तातडीने बचत गटाशी जोडून घेऊन शासकीय योजनांचा लाभ घ्यावा.

साहू एकल महिला सक्षमीकरण समितीचे जिल्हा प्रतिनिधी विनोद पगार यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. राज्यस्तरावर कार्यरत असलेली ही संस्था एकल महिलांना विविध योजनांचे मार्गदर्शन करणे, अर्ज भरून घेणे आणि ते संबंधित शासकीय विभागांकडे हस्तांतरित करून लाभ मिळवून देण्याचे काम करणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच प्रशिक्षक उमाकांत पाटील यांनी जिल्हा उद्योग केंद्र व उद्योजकता विकासाच्या माध्यमातून रोजगाराच्या उपलब्ध संधींवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला धुळे तालुक्याचे नायब तहसीलदार देवेंद्र येवलेकर, कृषी मंडळाधिकारी सचिन राजपूत, दीपक महाजन, ग्राम महसूल अधिकारी विजय बाविस्कर, प्रफुल्ल सावकारे, ग्रामपंचायत अधिकारी मेघाशाम बोरसे, कौशल्य व रोजगार विभागाचे मदन पाटोळे, कौस्तुभ नागरे आणि खादी ग्रामोद्योगचे भदाणे उपस्थित होते. या सर्व अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागाच्या योजनांची माहिती देऊन महिलांनी त्याचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले.या वेळी माजी पंचायत समिती सदस्य अविनाश महाजन आणि माजी सरपंच लखन ठेलारी यांनी उपस्थित राहून उपक्रमास सहकार्य केले. जोशाबा संस्थेचे अध्यक्ष दिलीप माळी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी कार्यशाळेच्या आयोजनात मोलाचा वाटा उचलला.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी उद्धव धारणे, तालुका अभियान व्यवस्थापक हेमंत गवते, छाया कासार, ज्योती पगारे, वैशाली कुलकर्णी, मीना देवरे, अतुल पाटील, कुणाल दुसाने, योगिता पाटील, अशोक माळी, रमेश माळी, विठ्ठल चित्ते, वंदना माळी, सुलभा ईशी, वैशाली शिरसाठ, मंगला इंदासराव, स्मिता तांबट, अनिता वाणी, किर्ती कासार, ज्योती अहिराव यांच्यासह प्रभागातील समुदाय संसाधन व्यक्ती आणि ग्रामसखींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रुग्ण मित्र दिलीप माळी यांनी केले. सूत्रसंचालन आरिफ पठाण व ज्योती देवरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उमेदचे तालुका व्यवस्थापक ईश्वर पाटील यांनी मानले.

## पान १ वरुन

### शहादा येथे जेलभरो आंदोलन

विरोधात प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. वाहतूक सुरळीत करण्यासाठी कार्यकर्त्यांना अटक करून नंतर सोडून देण्यात आले. तहसीलदार संभाजीराव पाटील यांनी रास्ता रोको तसेच जेलभरो आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. माकपाचे तालुका सचिव सुनील गायकवाड यांनी लाल बावटा युनियन व विविध संघटनांतर्फे तहसीलदारांना मागण्याची निवेदन दिले. या निवेदनात पुढीलप्रमाणे मागण्या करण्यात आल्या त्यात प्रामुख्याने शेतमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव मिळावा, वनजमिनीवरील दाव्यांबाबत स्वतंत्र ७/१२ तयार करावे तसेच अपात्र ठरविण्यात आलेल्या दाव्यांचा फेरविचार करावा, गायरान, देवस्थान, इनामी तसेच सरकारी जमिनीवरील निवासी व शेतीचे अतिक्रमण नियमित करावे, वीज प्रश्नावरही संघटनेने आक्रमक भूमिका घेतली असून स्मार्ट मीटरचा निर्णय बंद करावा, गावठाण फिडरवरील लोडशेडिंग थांबवावे आणि घरगुती विजपुरवठा २४ तास सुरू ठेवावा तसेच जिल्ह्यातील खराब रस्त्यांच्या कामांची चौकशी करून निकृष्ट कामांसाठी जबाबदार असलेल्या संबंधित ठेकेदार व अभियंत्यांवर कठोर कारवाई करा, वाढती महागाई व बेरोजगारीला आळा घाला, शेतमजूरांना किमान वेतन जाहीर करा, रेशन धान्य दुकानातून दरमहा प्रत्येक कुटुंबाला ३५ किलो धान्य, खाद्यतेल, साखर व इतर डाळी यांचे वाटप करा. संजय गांधी व श्रावण बाळ निवृत्ती वेतन योजने अंतर्गत ३००० रुपये पेन्शन अदा करा. अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा कर्मचारी, गटप्रवर्तक, शालेय पोषण आहार कर्मचारी, व पेसा मोबिलयझर यांना कायम करा अशा मागण्या यावेळी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आल्या. सदर आंदोलन शांततापूर्ण व लोकशाही आणि संविधानाच्या चौकटीत राहून करण्यात आले.

यावेळी आखिल भारतीय किसान सभा प्रतिनिधी किरण सुभाष मोरे, महाराष्ट्र राज्य शेतमजूर व इतर मजुर युनियनचे संतोष गायकवाड, शेतमजूर युनियन राजाराम ठाकरे, खंडू सामुद्रे, हारू भाऊ सोनवणे, श्रीमती जीराबाई ठाकरे, मासुम मनियार, दिनेश गुलाले, सुदाम चौधरी, रफिक शेख, जगन ठाकरे, नईम सैय्यद, रमन बच्छाव, हमीद शहा, संजय बागले, पंडीत पवार यांच्यासह २५० जेलभरो आंदोलकांची अटक करुन सुटका करण्यात आली.

### बैल, शेळ्या लंपास

देसले यांच्या शेतात बांधलेल्या ३० शेळ्या चोरट्यांनी नेल्या. ७ ऑगस्टला रात्री चोरीचा प्रकार घडला. ९५ हजार रुपये शेळ्यांची किमत आहे. याप्रकरणीभिमराव देसले यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नरडाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### धुळे पाणी पुरवठा योजनेचे व्हॉल्व..

तपासून त्यांचा जबाब नोंदवावा. जलवाहिनीवरील दोन वॉल नेमके कधी,कशा पद्धतीने आणि कोणाच्या आदेशाने तोडण्यात आले,याचा तपास करावा.तसेच कथित घटनेत वापरण्यात आलेल्या जेसीबीचा शोध घेऊन त्याची मालकी व चालकाची चौकशी करावी,अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

जलवाहिनीचे नुकसान जाणीवपूर्वक करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाल्यास संबंधित व्यक्तींविरुद्ध कायद्यानुसार गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी.तसेच जलवाहिनीच्या देखभाल,दुरुस्ती व सुरक्षेची जबाबदारी असलेल्या विभागाची आणि संबंधित अधिकाऱ्यांचीही चौकशी करून जबाबदारी निश्चित करा, शहरातील काही भागात अनेक दिवस पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून वस्तुस्थिती नागरिकांसमोर स्पष्ट करावी,अशी मागणी आलोक रघुवंशी यांनी केली.आमदारांनी केलेला आरोप तथ्यहीन असेल तरी त्याची सत्यता तपासणे आवश्यक आहे आणि आरोप सत्य असल्यास सार्वजनिक जलवाहिनीचे नुकसान करणाऱ्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.दोषी व्यक्ती कोणत्याही राजकीय पक्षाची असो, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई झालीच पाहिजे,असे रघुवंशी यांनी निवेदनात म्हटले आहे. निवेदन देतांना ब्लॉक अध्यक्ष दीपक पाटील, अभय पाटील, विनायक सोनवणे, कृष्णा ठाकूर उपस्थित होते.

### भीम आर्मीचे न.प.ला निवेदन

करण्यात आली आहे. गौतम नगरातील जुने समाज मंदिर जीर्ण व धोकादायक झाल्याने त्याची तांत्रिक तपासणी करून आवश्यक कार्यवाही करावी आणि त्याठिकाणी ३ मजली नवीन समाज मंदिर उभारावे. या इमारतीत सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच परिसरातील गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत संगणक प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुसज्ज हॉल उभारावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास पुढील काळात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदनावर भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष संजय रगडे, विजय अहिरे, अनिता निकुंबे, प्रियंक भालेराव, मनीषा पगारे यांच्यासह गौतम नगर परिसरातील रहिवाशांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### जाम जावदे येथे भव्य पुलाचे लोकार्पण

सांगितले की, आदिवासी संस्कृतीचा वारसा जपणे आणि आदिवासी बांधवांचा सामाजिक व आर्थिक विकास साधणे हे आपले मुख्य ध्येय आहे. जाम जावदे येथील नव्याने उभारण्यात आलेल्या पुलामुळे परिसरातील दळणवळणाचा प्रश्न कायमचा सुटणार असून नागरिकांची मोठी सोय होणार आहे. तसेच भगवान बिरसा मुंडा यांचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी हे स्मारक प्रेरणास्थान ठरेल.यावेळी उपस्थित मान्यवरांनीही आपले विचार मांडून आदिवासी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक कार्यकर्ते व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. सोहळ्यास परिसरातील नागरिकांची तुफान गर्दी पाहायला मिळाली.

### धुळ्यात अभियंत्यावर प्राणघातक हल्ला

काहींनी वाद घातला. अभियंता निळे यांच्या कंपनीचे मालक दिनेश पोतदार यांच्याविषयी शिवीगाळ केली. परेश निळे यांनी समजावण्याचा प्रयत्न केला असता त्यांना शिवीगाळ करीत मारहाण केली, ठार मारण्याची धमकी दिली. डोक्यावर लोखंडी रॉडने हल्ला करून गंभीर दुखापत केली. त्यांच्या गळ्यातील तीन तोळ्याची सोन्याची चैनही हिसकावली. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात योगेश भोकरे याच्यासह तीन संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. पोलीस उपनिरीक्षक खालिदा सैय्यद करत आहेत.


# भूपेशभाई पटेलांच्या हस्ते असली येथे विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण

**शिरपूर, दि.११- जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिनाचे औचित्य साधून असली-तांडे ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल व आमदार काशिराम पावरा यांच्या विकास निधीतून प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणी चेअरमन भूपेशभाई पटेल यांच्या हस्ते विविध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला.**

असली येथे सभामंडप बांधकाम, व्यायामशाळा बांधकाम व बंदिस्त गटार बांधकाम, तांडे येथे रस्ता काँक्रीटीकरण, धनपूर येथे जिल्हा परिषद शाळेच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. तसेच तांडे येथे पाणी फिल्टर प्लांट व सौर हायमास्ट दिवे बसविण्याच्या कामांचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान महादेव, वीर एकलव्य व क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. जागतिक आदिवासी दिन आणि क्रांती दिनाचे महत्त्व विशद करताना आदिवासी समाजाच्या संघर्षाचा, शौर्याचा आणि योगदानाचा गौरव करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना भूपेशभाई पटेल यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विकासकामांचे कौतुक केले. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायत यांच्यातील समन्वय महत्त्वाचा असून, विकासाच्या वाटचालीत आम्ही नेहमी आपल्या सोबत आहोत अशी ग्वाही त्यांनी दिली. गावातील मूलभूत सुविधांच्या विकासासाठी आवश्यक ती मदत व सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. असली येथील लोटन कोळी यांनी ग्रामस्थांना संबोधित करताना गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या, पूर्ण झालेल्या तसेच प्रस्तावित विविध विकासकामांची माहिती दिली. गावाच्या विकासासाठी सहकार्य केल्याबद्दल त्यांनी आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा व भूपेशभाई पटेल यांचे विशेष आभार मानले.ज्येष्ठ समाजसेवक पांडुरंग धनगर यांनी ग्रामस्थांना जागतिक आदिवासी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सुनील कोळी यांनी विकासकामांमुळे नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध होणार असून, या सुविधांचा नागरिकांनी योग्य प्रकारे लाभ घ्यावा, असे आवाहन केले.या कार्यक्रमास सरपंच प्रशासक पार्वताबाई वंजारी, माजी उपसरपंच हिराबाई कोळी, रूपाली कोळी, माजी सरपंच लाडकाबाई भिल, दुर्गाबाई मोरे, पांडुरंग कोळी, मधुकर मंगळे, पुंजू कोळी, छोटू धनगर, संतोष वंजारी, प्रकाश धनगर, भटू कोळी, भगवान कोळी, नामदेव कोळी, राणा भरवाड, विजय चित्ते, रूपा पावरा, उखडू कोळी, लक्ष्मण कोळी, संजय वंजारी, अमोल कोळी, सुनील कोळी, गजेंद्र धनगर, शैलेश भरवाड, अमृत थोरात, प्रविण पावरा, सागर कोळी, भूषण कोळी, राज कोळी, विक्की कोळी, सागर राजपूत, विनोद मंगले, समाधान अहिरे, महेंद्र जावळे, रामा भिल, नागो भिल, स्वीय सहाय्यक सुनील जैन, किशोर माळी यांच्यासह ग्रामस्थ, युवक, महिला व विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदेश हजारे यांनी केले, तर सुरेश महाजन यांनी आभार मानले.कार्यक्रमाचे आयोजन सुनील मोरे (माजी उपसरपंच), सुनील कोळी, लोटन कोळी, राहुल ईशी (अध्यक्ष, सातपुडा समिती), नुरसिंग पावरा, गीतांजली पाटील (ग्रामपंचायत अधिकारी) यांनी केले.विविध विकासकामांच्या शुभारंभामुळे असली, तांडे व धनपूर परिसरातील नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक सक्षमपणे उपलब्ध होण्यास मदत होणार असून, ग्रामस्थांनी या विकासकामांचे स्वागत केले.


## उठावना एवं शोक-बैठक



**स्व.शकुंतला बाई अग्रवाल**

बड़े दुख के साथ आपको सूचित किया जाता है कि स्व.रामगोपाल, स्व. वसंतलाल, स्व.कमलकिशोर इनकी बहन तथा रमाकांत, निलकांत, शाशिकांत, शेखर, संदीप इनकी भुवाजी, स्व.सुरेषचंद्र अग्रवाल इनकी पत्नी शकुंतला देवी का दुखद निधन १०/०८/२०२६ को हो गया है।

उनका उठावना आज बुधवार दि.१२/८/२०२६ को शाम को ४:०० बजे अग्रवाल विश्राम भवन, नदी किनारे, धुलिया यहा पर है

-: शोकाकुल :-

नंदकिशोर बाबूलाल अग्रवाल  किशोर काळूराम अग्रवाल
रविंन्द्र मदनलाल अग्रवाल  रमाकांत वसंतलाल अग्रवाल
निलकांत, शशिकांत, शेखर, संदीप, मनीष, सचिन, पवन, यतीराज, निकुंज, कृष्णा, रजत, चिन्मय, तन्मय एवं समस्त भुतिया परिवार

**फर्म- पुसमल पापालाल अग्रवाल**

## ब्राम्हण पाहिजे

मंदिराच्या दैनंदिन पूजेसाठी ब्राम्हण पाहिजे,
वेळ सकाळी ६ ते १२,
सायं. ४ ते ८
भेटण्याची वेळ सायं. ५ ते ६
-: संपर्क :-
श्री. जलाराम मंदिर
नटराज टॉकीज मागे, धुळे

## पाहिजेत

1) Helper - 3
2) Office Boy- 2
3) Electrician - 2
4) Project Manager-1
-:संपर्क:-
चैतन्य टेलिकॉम
गरुड कॉम्प्लेक्स,
कमलाबाई शाळेसमोर,
साक्री रोड, धुळे.
9225606888

## पाहिजेत

टायपिस्ट म्हणून मुलगा/ मुलगी पाहिजेत. इच्छुकांनी सायंकाळी ६ वाजता समक्ष भेटावे.
अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
श्रीविनायक डायग्नोस्टीक सेंटर
हॉटेल गणपती पॅलेस समोर,
मालेगाव रोड, धुळे

## पाहिजेत

किड्स वेअरसाठी सेल्समन आणि सेल्सगर्ल पाहिजे.
-: भेटा :-
सोना लेडीज वेअर किड्स वेअर
पारोळा रोड, धुळे
9767544005

## पाहिजेत

- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

## दुकान विकणे आहे

मुख्य बाजारपेठ मधील गल्ली नं.४ येथील बालाजी मंदिरासमोर क्षेत्र (१०.०१) चौ.मी दुकान योग्य किंमतीत विकणे आहे.
- संपर्क -
8830291946

## गरम पाण्याचा एकच उपाय...

BAJAJ Crompton Racold USHA




आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...

* मॉडेल अनुसार

59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते **श्री महावीर** इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०